# फेसबुक महिमा

## फेसबुक खरच हानिकारक आहे कां?

कालच जोशी काकांचा इमेल आला, त्यांनी फेसबुक वरून आपलं नाव काढून घेतलं आहे, त्यांना मी कारण विचारलं, तर त्यांनी सांगितलं कि भारतात अनेक मराठी वृत्तपत्रात लेख छापून आले आहेत कि हि लोकं आपली माहिती विभिन्न व्यवसायांना जाहिराती साठी पुरवतात, लोकांची माहिती ते राजकारणासाठी देखील पुरवतात. मी स्वत: देखील अशे काही लेख वाचले आणि मला असं वाटलं कि ज्यांना सोशल मिडिया बद्दल फारशी माहिती नाही किंवा अशी मंडळी, ज्यांनी ह्याचा फारसा अभ्यासही केला नाही, त्यांच्यासाठी हि माहिती अगदी बॉम्ब-विस्फोटा सारखी धक्का दायक ठरली असावी आणि ह्या मंडळींनी चक्क आपलं नावच काढून घेतलं. खरतर मलाही बऱ्याच गोष्टी ह्याचा अभ्यास केल्यावरच कळल्या. काही फेसबुक updates आपल्या नकळत होत असतात. अधून मधून setting मध्ये जाऊन तपासणी करणे फार गरजेचे आहे.

तसं बघितलं तर नुसतं फेसबुकच नव्हे तर सगळेच सोशल मिडिया platforms आणि इमेल देखील तुमची माहिती तुमच्या computer आणि internet च्या वापरातून बाहेरच्या व्यवसायांना पुरवत असतात. सगळ्यात पहिले तर हे जाणून घेणे जरुरी आहे कि जी माहिती हि लोकं पुरवतात, त्यामुळे तुमचं वैयक्तिक नुकसान होतं का?

जी माहिती पुरवली जाते ती साधारण तुमच्या आवडी-निवडी, तुमची पर्यटन ठिकाणं, तुम्हाला कुठलं पुस्तक किंवा सिनेमा आवडतो, तुम्ही वाचन-लेखन करता कां? अशी साधारण माहिती तुमच्या “shares” आणि “likes” वरून काढली जाते आणि मग हि लोकं त्याप्रमाणे जाहिराती दाखवतात. आता एक उदाहरण सांगते: मागच्या वर्षी मी भारताच तिकीट बघत होते आणि माझ्या एका फेसबुक contact नी एक कंपनीची ची लिंक शेयर केली होती, deal फारच सुंदर होती म्हणून मी पण ती क्लिक करून वाचली आणि मला एक सुंदर तिकीट मिळालं सुद्धा! आता मी हि लिंक वाचली आणि वापरली अशी माहिती नक्कीच दुसर्या travel agents ला पुरवली गेली आणि त्यानंतर मला एक पेक्षा एक सुंदर travel agents च्या जाहिराती दिसायला लागल्या. आता ह्यात माझं काहीच नुकसान झालं नाही, उलट मला उपयोगी अश्या जाहिराती दिसू लागल्या.

आपण कुठल्याही गोष्टितलं चांगलं काय ते घ्यायचं, वापरायच, सतर्क राहून पुढे कूच करायची! आता मलाच तुमच्या सारखी असंख्य वाचक मंडळी माझ्या www.marathiculturandfestivals.com संकेतस्थळाला लाभली आहे, त्यात सगळ्याच सोशल मिडिया sites चा हातभार आहे. फेसबुक चा तर नक्कीच आहे. फेसबुक वर ह्या संकेतस्थळासाठी बनवलेला ग्रुप आहे त्यात हजारोनी सदस्य आहेत आणि मराठी संस्कृती विषयी माहिती इथे शेयर केली जाते.

मुख्य म्हणजे जी माहिती तुम्हाला personal ठेवायची आहे ती माहिती तर आपण कुणाकडेच देत नाही, फक्त सरकारी व्यवहार, बँक, नौकरी अश्या ठिकाणीच आपण आपली खाजगी माहिती शेयर करतो. फेसबुक ला किंव्हा दुसर्या कोणत्याही सोशल मिडिया ला घाबरून जाऊन ते बंद करणे अजिबात जरुरी नाही. स्वत:ला सतर्क आणि सुरक्षित ठेऊन तुम्ही हया sites चा नक्कीच आनंद घेऊ शकता.

फेसबुक वर बऱ्याच गोष्टी बाहेर शेयर करण्याची परवानगी तुम्ही control करू शकता, खाली मी हि सगळी माहिती देत आहे:

१. Location services: तुम्ही कुठे जाता? कुठल्या restaurant मध्ये जेवता? कुठे खरेदी करायला जाता हि माहिती जर कां तुम्हाला शेयर करायची नसल्यास हि सेवा शक्यतो बंद करा:




iPhone वर: Setting app वर क्लिक करा -> खाली scroll करा आता Privacy हयावर क्लिक करा




आता  Location Services ह्यावर  क्लिक  करा




खाली  scroll  करा  आणि  facebook  च्या  चित्रावर  क्लिक  करून  “never”  अशी  setting  निवडा.




Android वर: account setting वर क्लिक करा→ Location वर क्लिक करा→ facbook वर क्लिक करून "never" निवडा.

## २. Third party apps आणि दुसर्या हानिकारक संकेत स्थळांना नाही म्हणा:

हि खुपच महत्वाची step आहे, खर सांगू तर आपल्या नकळतच ह्या apps आणि लिंक्स तुमच्या फेसबुक खात्यावर accept केलेल्या असतात. हाच data पुढे विकला जातो आणि विभिन्न राजकारण, व्यवसाय ह्यात वापरला जातो.

हि step तुम्ही तुमच्या desktop वरून चांगल्यारिते करू शकता.

Facebook च्या setting वर क्लिक करा



आता डावीबाजुला Apps and Websites tab दिसेल, ह्याचावर टिचकी मारा आणि तिथे edit वर जाऊन सगळाच access turn off करा.

## ३. तुमचं profile आणि post sharing:

हि पण खूब महत्वाची step आहे: Setting वर क्लिक करून डाव्याबाजूला “Privacy” वर टिचकी मारा आणि तुमच्या मर्जीप्रमाणे setting निवडा.




“friends only” हे निवडणे उत्तम!

## ४. वैयक्तिक माहिती आणि जाहिराती

About me मध्ये तुमच्या बद्दल कमीत कमी माहिती द्या, शिक्षण, शाळेच नाव इत्यादी आणि जाहिरातींना कसं नाही म्हणायचं ते इथे बघा :

फेसबुक वर सगळ्यात वर उजव्याबाजूला एक गोलाकार मध्ये प्रश्न चिन्ह दिसतो त्याचावर क्लिक करा → आता Privacy check up ह्याचावर क्लिक करा :




इकडे तुम्ही परत तुम्हाला पाहिजे ती setting निवडू शकता. आता पुढच्या step मध्ये आपण जाहिरातींना नको म्हणूया! मागच्या सारखच setting ला टिचकी मारून डाव्याबाजूला Ads वर क्लिक करा




ad setting ला जाऊन “not allowed” निवडा.

वरील सगळ्या steps केल्यावर तुम्ही बऱ्यापैकी सुरक्षित असता. फेसबुकच चांगलं घ्या आणि वाईट ला राम राम ठोका! फेसबुक नी तुम्हाला काय चांगलं दिलं आहे त्याचा आनंद घ्या. किती मित्र मैत्रिणी तुम्हाला मिळाल्यात? किती छान-छान लेख तुम्हाला वाचयला मिळतात, कितीतरी बौद्धिक ग्रुप्स आहेत त्याच्यात तुम्ही आपली मतं मांडू शकता, तुम्ही काही उपक्रम हातात घेतला असेल तर त्याच्या बद्दल तुमची जाहिरात मात्र फुकटच.

म्हणून सांगते फेसबुक ला घाबरू नका उलट आनंद घ्या पण आपल्याला वाचवून!

मला तर बाबा फेसबुक पावला आहे जसा मला पावला, तसा तुम्हालाही पावो हीच श्रीचरणी प्रार्थना.

ऐश्वर्या कोकाटे

संपादिका

मराठी कल्चर एंड फेस्टिवल्स